RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ९, अंक ८९] सोमवार, जून २६, २०२३/ आषाढ ५, शके १९४५ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २४७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### उच्च व तंत्र शिक्षण विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २६ जून, २०२३.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६.**

क्रमांक संकीर्ण-२०२३/प्र.क्र.७७/विशि-३.— ज्याअर्थी, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महा. ६) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे.) याच्या कलम ३ च्या पोट-कलम (६) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासनाने उच्च व तंत्र शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक संकीर्ण-२०१९/ प्र.क्र.१८५/विशि-३, दिनांक २७ ऑक्टोबर, २०२१ (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे.) अन्वये प्रमुख महाविद्यालय म्हणून यशवंतराव चव्हाण विज्ञान संस्था, सातारा आणि घटक महाविद्यालये म्हणून छत्रपती शिवाजी महाविद्यालय, सातारा व धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालय, सातारा यांचे मिळून कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त विद्यापीठ" असा करण्यात आला आहे.) स्थापन करून त्याचे प्राधिकरण, अधिकार व कार्ये निश्चित केली आहेत ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेच्या खंड १२ मध्ये उक्त विद्यापीठाच्या कुलगुरू च्या नियुक्तीसाठी समिती व अर्हतेसंदर्भात तरतूद केली आहे.

आणि ज्याअर्थी, विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम, १९५६ (सन १९५६ चा ३) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून विद्यापीठ अनुदान आयोगाने विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये शिक्षण आणि इतर शैक्षणिक कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीसाठी किमान पात्रता आणि उच्च शिक्षणातील मानके राखण्यासाठी उपायांसाठी परिनियम, २०१८ निर्गमित केले आहेत.

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महा.६) कलम ३ च्या पोट-कलम (६) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन उक्त अधिसूचनेतील कुलगुरू पदाच्या नियुक्तीच्या व अर्हतेच्या तरतुदीमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :—

उक्त अधिसूचनेतील खंड १२ मधील उपखंड २—

१. परिच्छेद (क) ऐवजी खालीलप्रमाणे परिच्छेद समाविष्ट करण्यात येईल :—

"(क) कुलगुरूच्या नियुक्तीसाठी योग्य अशा नावांची शिफारस करण्याकरिता, पुढील सदस्यांचा समावेश असलेली एक समिती असेल :—

(एक) कुलपतींनी नामनिर्देशित केलेली व्यक्ती, जी उच्च शिक्षणाच्या क्षेत्रातील एक विख्यात व्यक्ती असेल आणि जो एकतर, शिक्षण क्षेत्रातील राष्ट्रीय ख्यातीची विख्यात विद्वान व्यक्ती किंवा पद्म पुरस्कारप्राप्त व्यक्ती असेल- अध्यक्ष ;

(दोन) कुलाधिकाऱ्याने नामनिर्देशित केलेली उच्च शिक्षणाच्या क्षेत्रातील एक विख्यात शिक्षणतज्ञ व्यक्ती- सदस्य ;

(तीन) संस्थेने नामनिर्देशित केलेला एक उच्च शिक्षणाच्या क्षेत्रातील विख्यात शिक्षणतज्ञ आणि/किंवा उच्च शिक्षणाच्या क्षेत्रातील राष्ट्रीय ख्यातीची संस्था किंवा संघटना यांचा संचालक किंवा प्रमुख- सदस्य ;

(चार) राज्यशासनाने नामनिर्देशित केलेला, सचिव/ प्रधान सचिव उच्च व तंत्रशिक्षण किंवा महाराष्ट्र शासनाचा सचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी- सदस्य;

(पाच) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अध्यक्षाने नामनिर्देशित केलेली व्यक्ती- सदस्य.";

२. परिच्छेद (ग) मध्ये,—

अ. उप परिच्छेद (तीन) नंतर खालील उप परिच्छेद समाविष्ट करण्यात येईल :—

"(तीन-अ) कुलगुरू पदाची शैक्षणिक अर्हता व अनुभव विद्यापीठ अनुदान आयोग वेळोवेळी निश्चित करील त्याप्रमाणे राहील ;";

ब. उप परिच्छेद (चार) मधील, "शैक्षणिक अर्हता" या मजकुराऐवजी "अतिरिक्त शैक्षणिक अर्हता" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**विकास चंद्र रस्तोगी,**
शासनाचे प्रधान सचिव.

## HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 26th June, 2023.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PUBLIC UNIVERSITIES ACT, 2016.

No. MISC-2023/CR-77/UE-3.-Whereas, the Government of Maharashtra has, *vide* Government Notification, Higher and Technical Education Department, No. MIS-2019/CR-185/UE-3, dated the 27th October 2021 ( hereinafter referred to as " the said notification"), issued in exercise of the powers conferred by sub-section (*6*) of section 3 of the Maharashtra Public Universities Act, 2016 (Mah.VI of 2017) (hereinafter referred to as "the said Act"), constituted the Karmveer Bhaurao Patil University, Satara (hereinafter referred to as " the said University"), which shall comprised of a cluster of the Yashvantrao Chavan Institute of Science, Satara as lead college and Chhatrapati Shivaji College, Satara and Dhannajayrao Gadgil College of Commerce, Satara as the constituent colleges; and specified its authorities, powers and functions;

And whereas, clause 12 of the said notification provide for eligibility criteria and constitution of a committee for appointment of the Vice-Chancellor of the said University.

And whereas, in order to make the provisions of the eligibility criteria and constitution of Committee for appointment of the Vice-Chancellor of the said University. Contained in the said notification in consonance with the provisions of the University Grants Commission (Minimum Qualification for Appointment of Teachers and other Academic Staff in Universities and Colleges and Other Measures for the Maintenance of Standards in Higher Education) Regulations, 2018 framed under the University Grants Commission Act, 1956 (3 of 1956), the Government of Maharashtra considers it expedient to amend the said provision of the said notification;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section (*6*) of section 3 of the Maharashtra Public Universities Act, 2016 (Mah. VI of 2017), the Government of Maharashtra hereby amends the said notification, for the aforesaid purposes, as follows, namely :—

In the said notification, in clause 12, in sub-clause (*2*), —

*(i)* for paragraph *(a)*, the following paragraph shall be substituted, namely :—

"(a) There shall be a committee consisting of the following member to recommend suitable names for appointment of the Vice-Chancellor, namely :—

*(i)* a member nominated by the Chancellor, who shall be a person of eminence in the sphere of higher education and shall be either an eminent scholar of national repute or a recipient of Padma Award in the field of education – Chairperson;

*(ii)* a person of eminence in the sphere of Higher education as a nominee of Provost- member;

*(iii)* a person of eminence in the sphere of Higher education and/ or the Director or Head of an institute of an organization of high repute nominated by the Parent Body - member;

*(iv)* a member nominated by the State Government, not below the rank of the Secretary or the Principal Secretary of Higher and Technical Education or an officer not below the rank of the Secretary of the Government of Maharashtra;

*(v)* a member nominated by the Chairperson of the University Grants Commission.";

*(ii)* in paragraph (c),—

(a) after sub-paragraph *(iii)*, the following sub-paragraph shall be inserted, namely :—

"*(iii-a)* possess such educational qualifications and experience as may be specified by the University Grant Commission;";

(b) in sub-paragraph (*iv*), for the words "educational qualifications' the words "additional educational qualifications" shall be substituted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VIKAS CHANDRA RASTOGI,
Principal Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.